# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय स्व. इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे – ४०१ १०१ दुरध्वनी क्रं. २८१८११८२, २८१९२८२८

जा.क्र. मनपा/कर/ 302 /२०२१-२२

दि. २९ /०३/२०२२

प्रति,

१) जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग

२) सिस्टीम मॅनेजर
संगणक विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता करनिर्धारण तपशील पहाण्यासाठी उपलब्ध केलेबाबत जाहीर सूचना प्रसिध्द करणे बाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचीतील प्रकरण ८ मधील नियम १०,१३(१), १४ व १५(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिळकतकरयोग्य मूल्य दर्शवणारा सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा कर आकारणी तपशील पहाण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मिळकतींचे मालक किंवा भोगवटाधारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ नियम १३ व १४ अन्वये असलेल्या तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यात आली असतची जाहिर सूचना दि. २९/०३/२०२२ रोजीचे वर्तमानपत्रात तसेच मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येत आहे.

त्याचप्रमाणे या जाहीर नोटीसनुसार विहित मुदतीत प्राप्त हरकतींवर नियमानुसार कार्यवाही करुन त्यानुसार निर्णय सक्षम प्राधिकारी यांचेकडून झाल्यानंतर आवश्यक त्या नोंदी संगणकात घेण्याबाबतही आदेश निर्गमीत करुन प्रभाग स्तरावर पुरवण्यात आलेल्या लॉग ईन आयडी व पासवर्ड वापरकरुन संगणकात नोंद घ्यावी.

( संजय शिंदे)
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत जाहीर सूचनेची प्रत.

प्रत –
प्रभाग अधिकारी
प्रभाग समिती क्रं. १, २, ३, ४, ५, ६

E:\Total Word Files\Letters_Genral_ism6...docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय स्व. इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे – ४०१ १०१ दुरध्वनी क्रं. २८१८११८२, २८१९२८२८

Azadi Ka Amrit Mahotsav

करनिर्धारणाबाबत - आक्षेप नोंदविण्यासाठी
// जाहिर सुचना //

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचीतील प्रकरण ८ मधील नियम १०, १३(१), १४ व १५(१) अन्वये तसेच महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या इमारतीवरील कर अधिनियम १९७९ कलम १०(१) अन्वये)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांस / भोगवटा धारकांस कळविण्यात येते की, (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचीतील प्रकरण ८ मधील नियम १०, १३(१), १४ व १५(१) अन्वये तयार करण्यात आलेला आकारणी तपशील आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर (पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९७९ कलम १०(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीचे करयोग्य मुल्य व मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मोठ्या निवासी जागा असलेल्या इमारती आणि त्यांचे करयोग्य मूल्य दर्शविणारा सन २०२२-२३ या कालावधीतील कर आकारणी तपशील संबधीत प्रभाग कार्यालय कार्यालयात दिनांक ०१/०४/२०२२ ते दि. २१/०४/२०२२ पर्यंत कामाच्या दिवशी व वेळेत संबधीत धारक / अधिकृत व्यक्तींना पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. सदर कर आकारणी बाबत मालमत्ता धारकांना खालील मुद्यांवर हरकत / सुचना दाखल करता येईल.

१. इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मूल्य चुकीचे नोंदविले असल्यास,
२. घर क्रमांक अथवा मिळकत मालकाचे / धारकाचे नांव चुकीचे नोंदविले असल्यास.
३. जमिनी अथवा इमारतीचे भाडे मूल्यात वाढ अथवा घट केली असल्यास.
४. इमारत अथवा तिचा काही भाग पाडुन टाकला असल्यास किंवा इमारत अस्तित्वात नसल्यास.
५. मिळकतीच्या वापरात बदल केला असल्यास.
६. इमारतीच्या क्षेत्रफळात वाढ अथवा घट केली असल्यास.

केवळ उपरोक्त मुद्यासंदर्भात हरकत / सुचना असल्यास ज्या प्रभाग / कार्यक्षेत्रातील आहेत त्याक्षेत्राकरीता असलेल्या प्रभाग कार्यालयाच्या पत्त्यावर प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्रं. ____ कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे नावे विहीत मुदतीत कागदोपत्री पुराव्यासह लखी अर्ज सादर करावेत.

दिनांक ०१/०४/२०२२ पुर्वी आणि दिनांक २१/०४/२०२२ नंतर आलेल्या तसेच अन्य स्वरुपातील अन्य ठिकाणी दाखल केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच प्रत्येक मिळकतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा.

तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ कलम १ ते ४ अन्वये इमारतीचा / मिळकतीचा मालमत्ता कर भरण्याची जबाबदारी ही मालमत्ताधारक / भोगवटा धारक यांची असते.

(संजय शिंदे)
उपायुक्त कर
मिरा भाईंदर महानगरपालिका

टिप –मालमत्तेवरील मालक / भोगवटादारांचे नाव दाखल करणे / बदल करणे / कमी करणेकरीता विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वतंत्र अर्ज करावा.

दि:२९/०३/२०२२
जा. क्रं. मनपा/कर/ ४८८ /२०२१-२२
मा. अति. आयुक्त सो. यांचे मान्यतेने
प्रत,
प्रभाग अधिकारी,
प्रभाग समिती क्रं. १,२,३,४,५,६